### ६२ वर्षीय वृद्धेवर यशस्वी शस्त्रक्रिया

# 'बॅरिएट्रिक'द्वारे वर्षभरात ३५ किलो वजन कमी

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १५ : वयाच्या ६२ व्या वर्षी एका वृद्धेवर यशस्वी बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करण्यात आली. लीलावती रूग्णालयात ही शस्त्रक्रिया पार पडली. या शस्त्रक्रियेद्वारे एका वर्षात तब्बल ३५ किलो वजन कमी झाले आहे. शस्त्रक्रियेपूर्वी या महिलेचे वजन १३६ किलो इतके होते. आता या महिलेचे वजन १०१ किलो इतके आहे. लीलावती रूग्णालयातील बॅरिएट्रिक सर्जन डॉ. शशांक शहा यांनी ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे.

पार्वती वेणुगोपालन यांना वजन वाढल्याने चालताही येत नव्हते. २०२० मध्ये घरच्या घरी आधाराच्या मदतीने चालण्याची सवय केली. परंतु, घरात चालतानाही त्यांना अडचणी येत



होत्या. दैनंदिन कामे करण्यासाठीही त्यांना कुटुंबीयांवर अवलंबून रहावे लागत होते. प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी लीलावती रुग्णालयातील डॉ. शशांक शहा यांच्याशी संपर्क साधला. डॉक्टरांनी त्यांना बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार, या शस्त्रक्रियेनंतर त्यांनी सुमारे ३५ किलो वजन कमी केले आहे.

## असे झाले उपचार

1 बॅरिएट्रिक सर्जन डॉ शशांक शहा म्हणाले, महिलेला व्हिलचेअरवर रूग्णालयात उपचारासाठी आणल्यानंतर गंभीर स्वरूपाचा स्लीप एपनिया आणि पायाला सूज होती.

2 अतिरिक्त वजनामुळे या महिलेला बसता किंवा उभे राहता येत नव्हते. अशा स्थितीत वजन कमी करण्यासाठी बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया करणे खूप गरजेचे होते.

3 पहिल्या १० दिवसांत १० किलो वजन कमी केले आहे आणि त्यानंतर या महिलेनं तब्बल ३५ किलो वजन कमी केले आहे. या शस्त्रक्रियेनंतर महिलेचा स्लीप एपनिया नियंत्रणात आला. आता कुठल्याही आधाराविना स्वतःच्या पायावर त्या चालू लागल्या आहेत.

बैठी जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि जंकफूडचे सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत आहे. ताणतणाव हे सुद्धा वजन वाढण्याचे कारण आहे. लठ्ठपणामुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो. याशिवाय लठ्ठपणामुळे गंभीर आजार होऊन मृत्यू होण्याचीही दाट शक्यता असते. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय आहे.

- डॉ. शशांक शहा, बॅरिएट्रिक सर्जन

वाढलेल्या वजनामुळे मी दैनंदिन कामे करू शकत नव्हती. पण, बॅरिएट्रिक शस्त्रक्रियेनंतर माझे आयुष्य बदलून गेले. या शस्त्रक्रियेनंतर मी वर्षभरात ३५ किलो वजन कमी केले आहे. त्यामुळे आता मी पुन्हा माझ्या पायावर चालू लागली आहे. जगन्नाथ मंदिरात मी चढून जाऊ शकले.

- पार्वती वेणुगोपालन, रुग्ण